सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६

आतील पानावर

पान २– इमरान खानचं दहा वर्षांनंतर सिनेसृष्टीत
पान ३– सलमानचा 'तेरे नाम' २२ वर्षांनी पुन्हा
पान ४– विजय सेतुपतीला मराठीत काम करण्याची
पान ५– 'प्रेम माणसाला अधिक चांगलं बनवतं'
पान ६– 'ईठा'साठी रणदीपचं जबरदस्त ट्रान्सफॉर्मेशन

# 'कल्की'च्या दुसऱ्या भागात साई पल्लवी



दीपिका पादुकोण बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने आजवर अनेक चित्रपटांत महत्त्वपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. दीपिका तिच्या तत्वांनुसार काम करते, पण तिला यामुळे काहीवेळा चांगले चित्रपटही गमवावे लागले आहेत. यापैकीच एक म्हणजे 'कल्की २८९८ एडी.' नाग अश्विन दिग्दर्शित २०२४ मध्ये प्रदर्शित झालेला 'कल्की २८९८ एडी' हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला होता. प्रेक्षकांनी चित्रपटगृहात हा चित्रपट पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यामध्ये दाक्षिणात्य अभिनेता प्रभास, अमिताभ बच्चन व दीपिका पादुकोण हे कलाकार प्रमुख भूमिकांमध्ये होते. चित्रपटाच्या पहिल्या भागाला मिळालेल्या यशानंतर या चित्रपटाचा सीक्वल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पण, यावेळी प्रेक्षकांना दीपिका पादुकोण यामधून पाहायला मिळणार नाही. सप्टेंबर २०२५ मध्ये संदीप रेड्डी वांगा यांच्या 'स्पिरीट'मधून एक्झिट घेतल्यानंतर दीपिकाची 'कल्की २८९८एडी'मधूनही एक्झिट झाली. दिवसाला फक्त ८ तास काम करणार अशी अट अभिनेत्रीने ठेवली होती. यामुळे संदीप रेड्डी वांगा व तिच्यामध्ये मतभेद झाले होते' अशीही चर्चा होती; तर 'कल्की'मधून एक्झिट घेण्यापूर्वी अभिनेत्रीने २० दिवसांसाठी चित्रपटाचं शूटिंगही केलं होतं. अशातच आता वृत्तानुसार 'कल्की' चित्रपटाची टीम दीपिकाची रिप्लेसमेंट म्हणून दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवीची निवड करण्याबद्दल चर्चा करत आहेत. 'कल्की' चित्रपटाच्या टीममधील एका व्यक्तीने उल्लेख केलेल्या माध्यमाशी संवाद साधताना सांगितलं की अद्याप काहीही ठरलेलं नाहीये, पण हो, दीपिकाच्या एक्झिटनंतर मेकर्स साईचा विचार करत आहेत. त्यांना साई त्या भूमिकेसाठी योग्य वाटत आहे. यावेळी त्यांनी साईच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे आणि स्वत: दिग्दर्शक नाग यांनीच तिची निवड केली आहे अशा अफवा खोट्या असल्याचं म्हटलं आहे. याबद्दल ते म्हणाले, या सगळ्या अफवा आहेत, अद्याप काहीही ठरलेलं नाहीये, थोडी वाट पाहा. दरम्यान, 'कल्की' या चित्रपटाच्या पहिल्या भागाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला होता; तर यातील अमिताभ बच्चन यांच्या कामाचं प्रेक्षकांकडून विशेष कौतुक झालं होतं. त्यामुळे आता चित्रपटाच्या दुसऱ्या भागाबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आहे.



# आता 'घातक'च्या सिक्वलची चर्चा




अभिनेता सनी देओलचा बॉर्डर २ सध्या चित्रपटगृहात धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करत प्रेक्षकांची पसंती मिळवली आहे. आता ९० च्या दशकात प्रदर्शित झालेल्या सनी देओलचा कल्ट क्लासिक चित्रपट घातक चित्रपटाच्या सिक्वेलची चर्चा सुरू झाली आहे. गदर २ आणि आता बॉर्डर २ या चित्रपटांच्या यशामुळे प्रेक्षक अभिनेता सनी देओलला त्याच्या जुन्या अवतारात पाहण्यास खूप उत्सुक आहेत. यामुळे अनेक निर्माते त्याच्यासोबत त्याच्या आधीच्या हिट चित्रपटांच्या सिक्वल बनवण्यास इच्छुक आहेत. दामिनी आणि घातक यांसारखे दमदार चित्रपट बनवणारे चित्रपट निर्माते राजकुमार संतोषी यांचे नाव समोर आले आहे. त्यांना १९९६ च्या घातक चित्रपटाचा सिक्वल घातक २ बनवायचा आहे.

राजकुमार संतोषी त्याच्यासोबत घातक २ बद्दल बोलले असून त्यांनी सिक्वल तयार करण्यात रस दाखवला आहे. सनीने राजकुमार यांना घातक २ ची कथा सांगण्यासाठी मनालीला बोलावले आहे. राजकुमारही मनालीला पोहोचे आहेत. त्यामुळे घातक २ तयार केला जाणार असल्याचे सांगितले जात आहे. तूर्तास यावर अधिकृत अशी कोणतीही माहिती समोर आलेली नाही. दामिनी, घातक आणि घायल नंतर राजकुमार संतोषी यांच्या दिग्दर्शनाखाली 'लाहोर १९४७' हा आणखी एक चित्रपट दिग्दर्शित करत आहेत. या चित्रपटाची निर्मिती अभिनेता आमिर खान करत आहे. असेही वृत्त आहे की सनीचा 'जाट २' हा चित्रपटही राजकुमार संतोषी दिग्दर्शित करणार आहेत. जर घातक २ प्रत्यक्षात बनवला गेला तर प्रेक्षकांना सनी देओलचे काशी त्रिवेदी हे पात्र पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळेल.



# इमरानचं दहा वर्षांनंतर सिनेसृष्टीत कमबॅक

अभिनेता इमरान खान बऱ्याच वर्षांनंतर स्क्रीनवर परतला आहे. आमिर खान निर्मित 'हॅपी पटेल' सिनेमातून त्याने कमबॅक केलं आहे. इमरान आमिरचा मामा आहे. मामाच्याच 'जाने तू या जाने ना' सिनेमातून त्याने पदार्पण केलं होतं. तर आता जवळपास १० वर्षांनंतर तो पुन्हा सिनेमात दिसत आहे. इतकी वर्ष तो कुठे होता, त्याने काम का केलं नाही अशा अनेक प्रश्नांवर आता त्याने उत्तरं दिली आहेत. 'हॅपी पटेल' सिनेमा कसा मिळाला यामागची कहाणी नुकतीच इमरानने सांगितली. एका मुलाखतीत तो म्हणाला, गेल्या दोन वर्षांत मी अनेक स्क्रिप्ट वाचल्या. पण एकही स्क्रिप्ट आवडत नव्हती. २०२३ शेवटी मोठ्या ब्रेकनंतर मी पुन्हा सोशल झालो. तेव्हा सगळे म्हणाले, 'अरे हा माणूस जिवंत आहे'. सगळे माझ्याशी पुन्हा संपर्क साधायला लागले. पण मी याकडे आधीपेक्षा वेगळ्या नजरेने पाहत होतो.

प्रत्येकालाच आपल्या करिअरकडून एकसारख्याच गोष्टी नको असतात. प्रत्येकाचा वेगवेगळा रस्ता असतो. मला स्वत:ला मोठा स्टार बनायचं नव्हतं. ना मी टॉप तीनमध्ये येण्यासाठी प्रयत्न करत होतो. जोपर्यंत मला सिनेमा आवडत नाही आणि मला तो बनवण्याची इच्छा होत नाही तोपर्यंत मी करणार नाही. मी तेव्हाच सिनेमा बनवेन जेव्हा मला काहीही गमावण्याची भीती नसेल. मी सिनेमे यासाठी केले जेणेकरुन मी माझ्या मित्रांसोबत मस्ती करु शकेन. मित्रांना एकत्र करुन मेकअप करायचं, कॉस्च्युम बघायचे आणि भूमिका साकारायची या नजरेने मी सिनेमा निर्मितीकडे पाहतो. कला म्हणजे काय ज्यात मजा आहे. हॅपी पटेलची स्क्रिप्ट वाचून मला हेच वाटलं की एक मजेशीर कॉमेडी आहे. मी कोणतंही नरेशन ऐकलं नव्हतं. पण मित्रांकडून ऐकून मला मजा आली. मी वीरला मेसेज केला की मलाही तुमच्यासोबत यामध्ये काम करण्याची इच्छा आहे. तेव्हा त्याने लगेच माझ्यासाठी एक भूमिका लिहिली जी आधी स्क्रिप्टमध्ये नव्हती, तो म्हणाला, 'चला मजा करु'.

# अक्षयसोबत झळकणार रानी मुखर्जी



रानी मुखर्जी आणि अभिनेता अक्षय कुमार दोघेही ९० च्या दशकातील कलाकार आहेत. या दोघांनी कारकीर्दीत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. परंतु चाहत्यांना त्यांची जोडी कधीच मोठ्या पडद्यावर पाहता आलेली नाही. आता चाहत्यांची ही इच्छा लवकरच पूर्ण होणार आहे. रानी स्वत:च्या २८ वर्षांच्या कारकीर्दीत पहिल्यांदाच अक्षय कुमारसोबत काम करणार आहे. अक्षयच्या एका यशस्वी फ्रेंचाइजीत रानी मुखर्जीची एन्ट्री झाली आहे. रानी आता 'ओह माय गॉड' या फ्रेंचाइजीच्या पुढील चित्रपटात मुख्य भूमिका साकारणार आहे. 'ओह माय गॉड'च्या तिसऱ्या भागात रानी मुखर्जीची वर्णी लागल्याने कहाणीत एक नवा ताजेपणा येणार आहे. 'ओह माय गाड ३ चे निर्मितीपूर्व काम सुरू झाले असून चालू वर्षाच्या मध्यापर्यंत याचे चित्रिकरण सुरू होणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन अमित राय करणार आहे. ओएमजी ३ ची कहाणी अधिक प्रभावी राहणार असल्याचे संकेत अक्षय कुमारने यापूर्वीच दिले आहेत. ओह माय गॉडच्या पहिल्या चित्रपटात अक्षयसोबत परेश रावल मुख्य भूमिकेत होते. तर दुसऱ्या भागात पंकज त्रिपाठी यांनी अक्षयसोबत काम केले होते. आता तिसऱ्या भागाच्या कहाणीविषयी प्रेक्षकांना उत्सुकता आहे.




# सनी देओल-अक्षय खन्नाची जोडी

नेटफ्लिक्सने मुंबईत आयोजित केलेल्या कार्यक्रमात 'व्हॉट्स नेक्स्ट ऑन नेटफ्लिक्स'मध्ये २०२६ साठी येणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट्सची अधिकृत घोषणा केली. या सर्व घोषणांमध्ये सर्वाधिक चर्चेत राहिलेला प्रोजेक्ट म्हणजे सिद्धार्थ पी. मल्होत्रा दिग्दर्शित लीगल ड्रामा 'इक्का'. 'इक्का'बाबत प्रचंड उत्सुकता असण्याचं सर्वात मोठं कारण म्हणजे सनी देओल आणि अक्षय खन्ना यांची जोडी. तब्बल २९ वर्षांनंतर हे दोन्ही कलाकार पुन्हा एकत्र स्क्रीन शेअर करताना दिसणार आहेत.

याआधी ते १९९७ साली आलेल्या आयकॉनिक वॉर फिल्म 'बॉर्डर'मध्ये एकत्र झळकले होते. नेटफ्लिक्सने 'इक्का'चा फर्स्ट लूक टीझर रिलीज करताच सोशल मीडियावर प्रतिक्रियांचा पूर आला आहे. सनी देओल आणि अक्षय खन्ना यांच्या स्क्रीन प्रेझेन्स आणि इंटेन्स परफॉर्मन्सचं जोरदार कौतुक केलं जात आहे. एका युजरने कमेंट केली, तारा सिंग आणि रहमान डकैतचा क्रॉसओव्हर! टीझर शेअर करताना नेटफ्लिक्सने लिहिलं, निर्दोष सिद्ध होईपर्यंत दोषी. पण कायदा सत्य शोधू शकेल का? प्रसिद्ध डिफेन्स लॉयर सिकंदर मेहरा आपल्या आयुष्यातला सर्वात मोठा नैतिक निर्णय घेतो. या कॅप्शनवरून स्पष्ट होतं की 'इक्का' हा केवळ कोर्टरूम ड्रामा नसून नैतिकता, सत्य आणि मानवी नात्यांवर आधारित एक सखोल कथा आहे. या चित्रपटात सनी देओल आणि अक्षय खन्ना यांच्यासोबत तिलोत्तमा शोम, दीया मिर्झा, संजीदा शेख आणि ज्योती मुखर्जी महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत.

कथा एका टॉप डिफेन्स लॉयरभोवती फिरते. वर्क फ्रंटबद्दल बोलायचं झालं तर सनी देओल अलीकडेच वॉर ड्रामा बॉर्डर '२'मध्ये लेफ्टनंट कर्नल फतेह सिंग कलेरच्या भूमिकेत दिसला होता तर अक्षय खन्ना आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर पार्ट १'मधील रहमान डकैतच्या भूमिकेमुळे चर्चेत होते.

# अक्षयची पत्नी घर सोडून गेली होती



२००५ मध्ये प्रदर्शित झालेला 'बरसात' हा चित्रपट सुरुवातीला अक्षय कुमारला ऑफर करण्यात आला होता. या सिनेमातील एका गाण्यासाठी अक्षयने शूट सुद्धा केलं होतं. मात्र, त्यानंतर खिलाडी कुमारने ऐनवेळी 'बरसात'मधून एक्झिट घेतली आणि पुढे यामध्ये बॉबी देओलने प्रमुख भूमिका साकारली. सामान्यत: मानधन, तारखा जुळत नसल्याने मुख्य अभिनेत्यांकडून एखाद्या सिनेमासाठी नकार दिला जातो. मात्र, या सगळ्या पलीकडे जाऊन अक्षयने सिनेमासाठी नकार देण्याचं कारण होती प्रियांका चोप्रा. दिग्दर्शक सुनील दर्शन यांनी काही महिन्यांपूर्वी एका मुलाखतीत खुलासा केला होता. अक्षय कुमार-प्रियांका चोप्राची जोडी बॉलीवूडमध्ये प्रचंड लोकप्रिय होती. या दोघांनी एकत्र अनेक सिनेमांमध्ये काम केलेलं आहे, यांची केमिस्ट्री एकेकाळी चर्चेचा विषय ठरली होती. पण, त्यानंतर एक दिवस असा आला जेव्हा अक्षयने प्रियांकासह भविष्यात काम न करण्याचा निर्णय घेतला. २००४-२००५ च्या दरम्यान अक्षय व प्रियांकाच्या अफेअरच्या चर्चा सर्वत्र रंगल्या होत्या. याचा परिणाम आपल्या संसारावर होऊ नये यासाठी अक्षयने सिनेमातून एक्झिट घेतल्याचं सुनील दर्शन यांनी सांगितलं. ते म्हणाले, बरसात चित्रपटात अक्षय कुमार प्रमुख भूमिका साकारणार होता. पण, त्यावेळी सर्वत्र अक्षय-प्रियांकाच्या अफेअरच्या बातम्यांनी जोर धरला होता. इतकंच नव्हे तर, अक्षयची पत्नी यामुळे घर सोडून गेली होती. एक अभिनेता म्हणून तुम्ही जबाबदारीने वागलं पाहिजे. जर तुमची पत्नी अभिनेत्री असेल, तिला इंडस्ट्रीमधल्या सगळ्या गोष्टी माहिती असतील आणि त्यातही तिने मोठ्या स्टार्सबरोबर काम केलेलं असेल तर अशावेळी काळजी घेतली पाहिजे. मी या परिस्थितीसाठी प्रियांकाला अजिबात जबाबदार धरत नाही. तिला ( प्रियांका ) योग्य वाटत होतं ते ती करत होती. असं सुनील दर्शन यांनी सांगितलं. पुढे या सिनेमात बॉबी देओलने मुख्य भूमिका साकारली. यानंतर प्रियांका चोप्राला देखील या अफेअरच्या चर्चांबाबत विचारण्यात आलं होतं. जर अफेअरच्या चर्चा खोट्या आहेत, त्यात काहीच तथ्य नाहीये मग तू अक्षय कुमारबरोबर काम करणं का थांबवलं? यावर अभिनेत्री म्हणाली होती, ज्यामुळे आपलं आयुष्य अधिक सोपं होईल असेच मार्ग मी नेहमी निवडते. मला कोणाच्याही आनंदी आयुष्यात हस्तक्षेप करायचा नव्हता. या अफवा मीडियामुळे पसरल्या होत्या.

# सलमानचा 'तेरे नाम' येणार २२ वर्षांनी पुन्हा भेटीला



सलमान खानचा कल्ट क्लासिक चित्रपट 'तेरे नाम' पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. सलमान खानचे चाहते हा चित्रपट पुन्हा रिलीज होणार असल्याने उत्सुक आहेत. हा चित्रपट जेव्हा पहिल्यांदा थिएटरमध्ये रिलीज झाला होता, तेव्हा त्याची कथा, सलमान खानचा लूक व खासकरून हेअरस्टाइलने आणि भूमिका चावलाच्या निरागसतेने प्रेक्षकांची मनं जिंकली होती. त्याचबरोबर या चित्रपटातील गाणी देखील सुपरहिट ठरली होती. सलमान खान आणि भूमिका चावलाची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन सतीश कौशिक यांनी केले होते.

'तेरे नाम' हा चित्रपट तमिळ ॲक्शन-ड्रामा 'सेतू'चा हिंदी रिमेक आहे. हा चित्रपट एका खऱ्या घटनेपासून प्रेरित असल्याचं म्हटलं जातं. सलमान खानचा गाजलेला चित्रपट 'तेरे नाम' १५ ऑगस्ट २००३ रोजी प्रदर्शित झाला होता. 'तेरे नाम' ने बॉक्स ऑफिसवरही चांगली कामगिरी केली होती. जवळपास २२ वर्षांपूर्वी तब्बल १० कोटी बजेटमध्ये बनवलेल्या या चित्रपटाने देशभरातील बॉक्स ऑफिसवर अंदाजे १४ कोटींची कमाई केली होती, तर जगभरातील त्याचे कलेक्शन अंदाजे २२ कोटी रुपये होते. त्या वर्षी या चित्रपटाला तब्बल २४ नॉमिनेशन्स मिळाली होती. 'तेरे नाम' हा बॉलीवूडचा एक कल्ट क्लासिक मानला जातो. चाहते बऱ्याच काळापासून 'तेरे नाम' हा चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्याची मागणी करत होते. अखेर चाहत्यांना हा चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहता येणार आहे. 'तेरे नाम' २७ फेब्रुवारी २०२६ रोजी पुन्हा एकदा चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. जर तुम्हाला हा चित्रपट घरी बसून पाहायचा असेल तर तुम्ही तो पाहू शकता. 'तेरे नाम' हा चित्रपट ZEE5 या OTT प्लॅटफॉर्मवर मोफत उपलब्ध आहे. चित्रपटाची कथा राधे मोहन (सलमान) या तरुणाभोवती फिरते. तो कॉलेजचा माजी विद्यार्थी असतो, पण तरीही त्याचा कॉलेजमध्ये दरारा असतो. तो निर्जरा (भूमिका चावला) नावाच्या एका सोज्वळ मुलीच्या प्रेमात पडतो. सुरुवातीला निर्जरा राधेच्या वागण्यामुळे त्याचा तिरस्कार करते, पण नंतर तिला त्याच्या प्रेमाची खात्री पटते. मात्र, जेव्हा ते एकत्र येतील असं वाटतं तेव्हा एका हल्ल्यात राधेच्या डोक्याला गंभीर दुखापत होते आणि त्याची मानसिक स्थिती बिघडते. या दुर्दैवी प्रेमकथेचा शेवट अत्यंत हृदयद्रावक आहे.




# तमीळ सिनेमासृष्टी चांगले चित्रपट बनवतेय!

अभिनेते प्रकाश राज मनोरंजन विश्वातील अनेक प्रादेशिक चित्रपटांमध्ये काम केलेल्या कलाकारांपैकी एक आहेत. ते तमीळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम व हिंदी या इंडस्ट्रीमध्ये गेली ३८ वर्षे सातत्याने काम करीत आहेत. पण, नुकतेच त्यांनी बॉलीवूडमधील चित्रपट त्यांची मुळं विसरले आहेत आणि हिंदी सिनेमापेक्षा तमीळ व मल्याळम चित्रपटांचे विषय अधिक चांगले आहेत, असंही म्हटलं आहे. प्रकाश राज यांनी त्यांच्या दमदार अभिनयानं प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. प्रकाश राज अनेकदा इंडस्ट्रीतील, तसेच समाजातील मुद्द्यांवर त्यांची मतं व्यक्त करीत असतात. अशातच आता केरळ साहित्यिक महोत्सवात त्यांनी हिंदी सिनेमांबद्दल प्रतिक्रिया देताना केवळ बॉक्स ऑफिसवरील आकडेवारी पाहून चित्रपट बनवले जात आहेत, असं म्हटलं आहे. प्रकाश राज म्हणाले, सध्याच्या घडीला मला असं वाटतं की, मल्याळम व तमीळ सिनेमासृष्टी खूप चांगले चित्रपट बनवत आहे; तर हिंदी सिनेमा दुसरीकडे त्यांची मुळं विसरला आहे. सगळं खूप छान, सुंदर प्लास्टिकसारखं आहे. आमच्या दाक्षिणात्य इंडस्ट्रीकडे सांगण्यासाठी विषय आहेत. तरुण तमीळ दिग्दर्शक दलितांचे विषय मांडत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून आशा वाढत आहेत. प्रकाश राज पुढे म्हणाले, मल्टीप्लेक्सेस आल्यानंतर बॉम्बे फिल्म इंडस्ट्रीनं फक्त मल्टीप्लेक्ससाठी चित्रपट बनवणं सुरू केलं. हे खूप क्यूट चित्रपट असतात. कारण त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. ते पेज ३ संस्कृती फॉलो करीत आहेत आणि त्यामुळे त्यांचा राजस्थान व बिहार येथील ग्रामीण संपर्क तुटला आहे. प्रकाश राज यांनी पुढे स्वातंत्र्यानंतर हिंदी सिनेमा सर्वधर्मसमभाव जपत होता. तेव्हा १९७७ मध्ये मनमोहन देसाई यांनी 'अमर अकबर अँथनी'सारखा चित्रपट बनवला होता. त्यात अमिताभ यांनी अँथनी हे पात्र साकारलं होतं; ऋषी कपूर यांनी अकबर व विनोद खन्ना यांनी अमर या भूमिका साकारल्या होत्या. त्यामुळे लोकांमध्ये एकजूट आणि देशसेवेची भावना निर्माण झाल्याचं चित्र दिसून आलं, असं म्हटलं आहे. प्रकाश राज पुढे म्हणाले, आता तसं काहीच राहिलेलं नाही. आजच्या काळात फक्त पैसे आणि दिसणं महत्त्वाचं झालं आहे. रील, पेज ३ व प्रमोशन या सगळ्या गोष्टींचं महत्त्व वाढलं आहे. या प्रवासात मला असं वाटतं की, इंडस्ट्रीचा प्रेक्षकांबरोबरचा संपर्क तुटला आहे. दरम्यान, प्रकाश राज अलीकडेच धनुष व क्रिती सेनॉनच्या 'तेरे इश्क में' या चित्रपटात झळकले होते. त्यांनी क्रिश्ना वामसी यांच्या २००२ साली आलेल्या 'शक्ती' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर त्यांनी खाकी, सिंगम, वाँटेड, दबंग, भाग मिल्खा भाग, हिरोपंती, गोलमाल अगेन व वेंकी' यांसारख्या हिंदी चित्रपटांत काम केलं आहे.

# विजय सेतुपतीला मराठीत काम करण्याची इच्छा

'महाराजा' सिनेमामुळे साउथ अभिनेता विजय सेतुपती मधल्या काळात चर्चेत आला होता. अनुराग कश्यपने सिनेमात खलनायकाचं काम केलं होतं. विजय सेतुपतीच्या अभिनयाचे तर सगळेच चाहते झाले. साउथमध्ये तर तो आघाडीचा अभिनेता आहेच पण आता बॉलिवूडम ध्येही तो लोकप्रिय झाला आहे. त्याचा 'गांधी टॉक्स' मुकपट नुकताच रिलीज झाला आहे. या सिनेमात मराठमोळा सिद्धार्थ जाधवही आहे. नुकतंच एका मुलाखतीत त्याने मराठी सिनेमात काम करण्याची इच्छा व्यक्त केली. 'गांधी टॉक्स'हा २०२६ मध्ये रिलीज झालेला पहिला मुकपट आहे. मराठी दिग्दर्शक किशोर बेलेकरने सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे. सिनेमात विजय सेतुपती, सिद्धार्थ जाधव, अदिती राव हैदरी, अरविंद सामी यांच्या भूमिका आहेत. नुकतंच विजय सेतुपती, सिद्धार्थ जाधव आणि सिद्धार्थने एबीपी माझा कट्ट्यावर हजेरी लावली. यावेळी विजय सेतुपती म्हणाला, सिद्धार्थबद्दल मी बोललोच. तो मराठी थिएटर, मराठी इंडस्ट्रीतून आहे हे तो अभिमानाने सांगतो. किशोरही मराठी इंडस्ट्रीतीलच आहे. मी त्यांना नेहमी म्हणतो की मराठीत आणखी मोठमोठे सिनेमे बनले पाहिजेत आणि मलाही मराठी इंडस्ट्रीत काम करायचं आहे. मी त्यांना तसं सांगितलं आहे. मी जास्त चित्रपट पाहिले नाहीत त्यामुळे कोण कोण चांगले दिग्दर्शक आहेत ते मला सांगा त्यांच्याकडून मी स्क्रिप्ट ऐकायला नक्कीच तयार आहे. मी मराठी बोलायचाही प्रयत्न करेन. विजय सेतुपतीने २०२४ साली आलेल्या 'मेरी ख्रिसमस'मध्ये काम केलं होतं. हा त्याचा पहिला हिंदी सिनेमा होता. यात त्याच्यासोबत कतरिना कैफ दिसली होती. तर त्याआधी २०२३ साली आलेल्या 'फर्जी' वेबसीरिजमधून त्याने हिंदीत पदार्पण केलं होतं. शाहिद कपूर यामध्ये मुख्य भूमिकेत होता. त्यांची ही सीरिज खूप लोकप्रिय झाली होती.



# धनुषसोबत झळकणार श्रीलीला



धनुषने अलीकडेच त्याच्या ५५ व्या चित्रपटाची घोषणा केली, ज्याचे नाव D55 असे ठेवण्यात आले आहे. निर्मात्यांनी स्टारकास्टचीही घोषणा केली आहे. दिग्दर्शक राजकुमार पेरियास्वामी यांच्या पुढील चित्रपटात धनुषसोबत ही अभिनेत्री पहिल्यांदाच मुख्य भूमिकेत दिसणार आहे, ज्यांनी यापूर्वी अमरन दिग्दर्शित केले होते. धनुषच्या आगामी चित्रपटाचे तात्पुरते नाव D55 आहे. हे तात्पुरते शीर्षक धनुषच्या ५५ व्या चित्रपटामुळे आहे. या चित्रपटात श्रीलीला पहिल्यांदाच त्याच्यासोबत मुख्य अभिनेत्री म्हणून दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन राजकुमार पेरियास्वामी करणार आहेत.

धनुष आणि श्रीलीला पहिल्यांदाच एका चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. चित्रपटाची निर्मिती कंपनी, वंडरबार फिल्म्सने ट्विटरवर ही घोषणा केली. त्यांनी लिहिले, तुम्हाला हे अपेक्षित नव्हते. सुंदर अभिनेत्री श्रीलीलाचे D55 मध्ये स्वागत आहे. धनुष, श्रीलीला आणि टीमचे अनेक फोटो देखील शेअर करण्यात आले आहेत, जे चाहत्यांमध्ये सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहेत. D55 हा एक मोठा प्रकल्प आहे. धनुष त्याची कंपनी वंडरबार फिल्म्स आणि आर टेक स्टुडिओजसोबत त्याची निर्मिती करत आहे. सध्या या चित्रपटाची निर्मिती मुंबईत सुरू आहे. २०२६ च्या अखेरीस चित्रीकरण पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. साई अभ्यंकर या चित्रपटाचे संगीत देत आहेत. हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे.





# मराठीत अजूनही एकी नाही

सिनेसृष्टीत एकाच दिवशी दोन, तीन, तर कधी चार मराठी सिनेमे एकत्रित प्रदर्शित होतात. त्यावर निर्मात्यांनी संगनमत करून काहीतरी निर्णय घ्यावा, जेणेकरून प्रत्येक मराठी सिनेमाला थिएटर मिळतील आणि प्रत्येक मराठी सिनेमा बॉक्स ऑफिसवर कमाई करू शकेल, अशी चर्चा अनेकदा झाली आहे. याचबद्दल आता अभिनेते अशोक शिंदे यांनीसुद्धा त्यांचं मत व्यक्त केलं आहे. अशोक शिंदे एका मुलाखतीत म्हणाले, माफ करा. कुणी वैयक्तिक घेऊ नका. पण मराठीत ती एकी अजून नाही. एक उदाहरण देतो, एकीकडे संजय लीला भन्साली यांचा 'पद्मावत' आणि अक्षय कुमारचा 'पॅडमॅन' हे सिनेमे एकाच दिवशी रिलीज झाले होते. तेव्हा भन्साली यांचा सिनेमा आधी रिलीज झाला आणि अक्षयचा नंतर एका आठवड्याने रिलीज झाला. त्यांनी ठरवून हा निर्णय घेतला की 'पद्मावत' आधी रिलीज व्हावा आणि 'पॅडमॅन' नंतर. एखाद्या सिनेमाचा विषय चांगला असेल, तर तो पुढच्या आठडव्यात पोहोचतोच. पण सुरुवातीचे जी कमाई असते, ती प्रत्येक सिनेमाला महत्त्वाची असते. वेगवेगळ्या आठवड्यात सिनेमे रिलीज झाल्याने सुरुवातीच्या कमाईचा फायदा त्या दोन्ही सिनेमांना झाला. पुढे ते म्हणाले, असं माझ्या एका सिनेमाबाबत झालं होतं, लक्ष्मण उतेकर यांच्याबरोबर मी 'लालबागची राणी' सिनेमा केला होता, ज्याचे निर्माते होते बोनी कपूर. त्याच दिवशी पाच सिनेमे रिलीज होत असल्याचं बोनी कपूर यांनी मला फोन करून सांगितलं. त्यावर मी चित्रपट महामंडळाच्या अध्यक्षांना सांगून इतर पाच चित्रपटांच्या निर्मात्यांना भेटलो. 'आपण एकेक आठवडा वाटून घेऊ', असं मी त्यांना म्हटलं. त्यावर त्यांची प्रतिक्रिया होती की, 'तुम्ही हिंदीवाल्यांना मदत का करताय?' त्यावर मी म्हटलं, 'अजिबातच नाही. मी महाराष्ट्रीयन आहे, मराठी आहे, भाषेचा मला अभिमान आहे. पण यात हिंदी-मराठी असं न करता आपण व्यवसाय म्हणून बघू. कारण यात सगळ्यांचेच पैसे गुंतले आहेत'. त्यावर दोन निर्माते म्हणाले की 'आपण म राठी माणसं आहोत. आम्ही तारीख बदलणार नाही. कारण आमचा सिनेमा 'शोले' आहे. म ाझ्या सिनेमांबद्दल मला विश्वास आहे की ते चालणार.' यानंतर अशोक शिंदे म्हणाले, शेवटी एका दिवशी पाच सिनेमे आलेच. त्यात दोन हिंदी असतातच, दोन दाक्षिणात्य सिनेमेसुद्धा, त्यात आणखी हॉलीवूड, आसामी,भोजपुरी आणि आता गुजरातीसुद्धा येत आहेत. सगळ्यांना वेळ वाटून दिल्यानंतर तेव्हा आम्हाला सकाळी ७, दुपारी ११, संध्याकाळी ४ आणि पुन्हा रात्री ११ असे शो मिळाले. यामुळे क्लेश सुरू होतात. हेच रिलीज जर एकेक आठवड्यांत केलं असतं, तर प्रेक्षकांकडेसुद्धा चॉइस असतो. त्यामुळे माझं मत आहे की, आपण विचार करून सिनेमे रिलीज करत नाहीत, तोपर्यंत मराठीत 'बाहुबली' होणारच नाही.

# उपेंद्र लिमये या सिनेमात खलनायकी भूमिकेत



अनेक मराठी, हिंदी, दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारलेले अभिनेते उपेंद्र लिमये आता तितक्याच ताकदीच्या खलनायकी भूमिकेत दिसणार आहेत. 'मन आतले मनातले' या चित्रपटात त्यांनी खलनायकी भूमिका साकारली असून, हा चित्रपट १३ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे. चित्रपटात उपेंद्र लिमये यांच्याबरोबर सुरेन, मानसी नाईक, ऋतुराज फडके, संदीप गायकवाड, कमलेश सावंत, अरुण नलावडे, यतीन कार्येकर, सिया पाटील, राजेश आहेर, विनीत भोंडे आदी कलाकारांच्या भूमिका आहेत.

सूर्य फिल्म वर्ल्ड प्रस्तुत 'मन आतले मनातले' या चित्रपटाची निर्मिती सुरेन महापात्रा यांनी केली आहे. सुरेन महापात्रा यांनी चित्रपटाचे कथा आणि पटकथालेखन, तर संवादलेखन मनोज सुधाकर येऊनकर यांनी केले आहे. जेम्स अँथनी यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. अभिजीत मजुमदार यांनी संगीत दिग्दर्शन, डॉ. सुनंदा डिवरे पळवणकर यांनी गीतलेखन केलं आहे. सुदर्शन सेनापती यांनी छायांकन, मलया आणि बिपिन यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. थॅलेसेमिया, गिल्बर्ड सिंड्रोम या आजारावर औषध शोधण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या एका डॉक्टर दाम्पत्याला औषधाचा शोध लागतो. या आजारांना त्यांचा मुलगाही तोंड देत असतो. शोध लागलेल्या औषधाचा प्रयोग ते आपल्या मुलावर करतात, पण त्या औषधाचा परिणाम नक्की कसा होतो. त्यानंतर वेगवेगळी वळणे घेत कथेत अनेक नाट्यमय घडामोडी घडतात. त्या मुलाचे नेमके काय होते, याचे उत्तर चित्रपटात पाहायला मिळणार आहे. राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त अभिनेते उपेंद्र लिमये यांनी प्रत्येक भूमिकेत खणखणीत अभिनय करून मराठी, हिंदी, दाक्षिणात्य चित्रपटात स्वतःची ओळख निर्माण केली आहे. 'मन आतले मनातले' चित्रपटातील त्यांची खलनायकी भूमिका हे चित्रपटाचं महत्त्वाचं आकर्षण ठरणार आहे.

# प्रेम माणसाला अधिक चांगलं बनवतं



अभिनेत्री मृणाल ठाकुर सध्या तिच्या आगामी चित्रपट 'दो दीवाने सहर में' आणि नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'भीगी भीगी' या गाण्यामुळे चर्चेत आहे. या दरम्यान काही काळापासून तिचं नाव अभिनेता धनुष याच्यासोबत जोडलं जात आहे. लग्नाच्या अफवाही पसरल्या होत्या, मात्र त्या नंतर खोट्या ठरल्या. या सगळ्या चर्चांमध्येच मृणालने प्रेमाबद्दल आपली भूमिका स्पष्ट केली आहे. एका मुलाखतीत मृणाल म्हणाली की, प्रेम हा खूप सुंदर आणि सकारात्मक अनुभव आहे. या जगात प्रत्येक व्यक्तीने प्रेमाचा अनुभव घ्यायला हवा. प्रेम तुम्हाला अधिक चांगला माणूस बनवतं, असं ती म्हणाली. प्रेमामुळे माणूस आपल्या आतल्या लहान मुलाच्या भावना समजून घेतो आणि त्या जखमा भरून निघण्यास मदत होते, असंही तिने सांगितलं. प्रेमात मुली जास्त समजूतदार होतात का? या प्रश्नावर मृणालने असहमती दर्शवली. ती म्हणाली, तसं असायलाच हवं असं नाही. जो कोणी प्रेमात असतो तो अधिक देणारा होतो मग तो स्त्री असो किंवा पुरुष. प्रेमात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते स्वीकारणं. कधी कधी प्रेम स्वीकारणं आणि समजून घेणं कठीण असतं. आज प्रेमाची व्याख्या सतत बदलत आहे. मृणाल पुढे म्हणाली की, प्रेम ही एकमेव स्थिर भावना आहे. तुम्ही प्रेमाला कसं पाहता, यावर सगळं अवलंबून असतं. जेव्हा तुम्ही प्रेमात असता, तेव्हा तुम्ही त्या व्यक्तीसाठी काहीही करायला तयार असता. त्या नात्यात तुम्ही स्वतःला पूर्णपणे समर्पित करता, असं तिने सांगितलं. मृणाल ठाकुर लवकरच रोमँटिक ड्रामा 'दो दीवाने सहर में' या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात तिच्यासोबत सिद्धांत चतुर्वेदी मुख्य भूमिकेत आहे. दोन व्यक्तींमधील आदर्श प्रेमकथा सांगणारा हा चित्रपट २० फेब्रुवारी रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. तसंच, ए.आर. रहमान यांच्या संगीतातील 'भीगी भीगी' हे गाणं सध्या प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे.



## 'हुकमाची राणी माझी। राया मी डाव जिंकिला।'

# उषा किरण

**कमाता हूँ बहुत कुछ पर कमाई डूब जाती है।' १९५४ सालच्या 'अधिकार' या हिंदी चित्रपटातल्या या कलात्मक विनोदी गीतात हरहुन्नरी अफलातून हावभावातून नटखट विनोद प्रसृत करणाऱ्या किशोरकुमार बरोबर उषा किरण या मराठमोळ्या अभिनेत्रीने तेवढ्याच विनोदी व खिलाडू अभिनयाने साथ देऊन मध्यम वर्गातील तंग परिस्थितीमुळे उद्भवलेली नवरा- बायकोतील किरकोळ भांडणं सादर करून आपले अभिनव रूप प्रकट करून मजा आणली. किशोरच्या तक्रारीवर त्या तोर्यात म्हणतात- 'लुटा देते है घर को मर्द, औरत घर बनाती है। किसीने अपना बनाके मुझको मुस्कुराना सिखा दिया। अंधेरे घर मे किसीने हसके चिराग दिलका जला दिया..' दोन उत्तुंग व्यक्तिमत्त्व उषा किरण व देवानंद यांच्या प्रेमसाफल्याचा आनंद, १९५३ सालच्या 'पतिता' चित्रपटातील या गाण्यात अत्यानंदाने कृतकृत्य होऊन स्वैरपणे प्रकट करतात. त्यांच्या उत्तुंग अभिनयातून तृप्तीचा आनंद प्रकट होतो. त्या काळात देवानंदसोबत नायिकेचा रोल मिळणे, हीच मुळात यशाची पावती होती.**

अफलातून' भारतीय चित्रपटसृष्टीचा श्रीगणेशाच मराठी माणसाने केल्यामुळे मराठी स्त्री व पुरुष कलाकारांचा ओघ साहजिकच जास्त प्रमाणात होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या स्त्री कलाकारात उषा किरणचे योगदान नाकारता येत नाही. उषा किरण यांनी २० च्या वर हिंदी व ३० च्या वर मराठी चित्रपटात कामे केलीत. त्यांच्या चित्रपट जीवनाचे हिंदी व मराठी असे दोन भाग आहेत. त्यांच्या मराठीतील योगदानाचा आपण आज परामर्ष घेऊ.

'हुकमाची राणी माझी। रायाने डाव जिंकिला' एकेकाळी घरोघरी गायले जाणारे हे प्रसिद्ध गाणे १९५१ च्या 'जशास तसे' चित्रपटातील असून उषा किरण यांनी अवखळ चटपटीत व हटके प्रकारात चक्क लावणीच्या बाजात सादर करून आपल्या नृत्यकलेचेही दर्शन घडविले. 'लागला रंग तुम्हा साधले डाव, दोन कैफात गुंग होता राहिले नाही भान, बायकी कावा माझा राखून डाव साधीला, राया मी डाव जिंकिला...' नृत्य गीत सादर करताना पत्त्याच्या डावातील करामती कौशल्याने सादर करून मोठ्या तोऱ्यात आपल्या सामर्थ्याचे वर्णन अभिनित केले. नियंत्रण ठेवणारे पुरुष स्त्रियांच्या राखीव (हुकमाच्या) पत्त्यापुढे डाव हारतात. हे सर्व नखरेबाज अंदाजात कुठेही बीभत्स न होता उषा किरण सादर करतात. 'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी हृदयी अमृत नयनी पाणी कुशीत तुझिया पुरुष धुरंधर अबला परी तू ठरसी जगावर दशा तुझी ही केविलवाणी स्त्री जन्मा ही तुझी कहाणी।' १९५१ सालच्या 'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी' चित्रपटात या महान अभिनेत्रीने साकारलेली स्त्री, समस्त स्त्री जातीचे शोषण कसे होते, याची गदिमांच्या विद्रोही शब्दांना उजागर करणारी होती. धुरंधर पुरुषाला आपल्या गर्भात पोसणारी स्त्री जगात अबला कशी ठरू शकेल? अशा प्रकारच्या वेदनांना या गाण्यातून वाचा फोडणाऱ्या स्त्रीची भूमिका सादर केली आहे.

**'बाळा जो जो रे। पापणीच्या पंखात झोपू दे, डोळ्यांची पाखरे'** भावप्रणवती व वात्सल्य सिंधू मातेच्या रूपात नंतरच्या काळात सर्वांना परिचित असलेल्या सुलोचना लाटकर यांच्या समकालीन उषा किरण यांनी त्यांच्याही आधी अशा प्रकारच्या आईचे पात्रं साकारली होती. वरील अंगाई गीतात बाळाला पाळण्यात निजवितानाचे वात्सल्य व जीवनातील कृतकृत्यता त्याच्या बालरूपात शोधण्याचा अभिनय साकारून घराघरातील मातांना आपलेसे केले. '**आली हासत पहिली रात उजळत प्राणांची फुलवात**' १९५९ सालच्या 'शिकलेली बायको' चित्रपटात हे गाणे उषा किरण व सूर्यकांत यांच्या लग्नानंतरच्या प्रथम मिलनाच्या रात्री चित्रित झाले आहे. 'प्रेमा काय देऊ तुला भाग्य दिले तू मला' वरील चित्रपटातील या गाण्यात नायकाच्या प्रेमात न्हावून तृप्त होऊन, चांदण्यातील शीतल फेरफटक्यात मग्न होऊन या सुखाच्या बदल्यात खुद्द प्रेमालाच मागणे मागण्यास सांगतात.

आरशासमोर उभ्या राहून आपल्या प्रतिबिंबाशी संवाद साधतानाचा अभिनय लाजवाब! 'मोहक सुंदर जे जे दिसते तूच तयाचा जन्मदाता' तृप्त प्रेमाचे चेहर्यावरील मोहक हावभाव कॅमेर्याने अचूक टिपले. 'कोकिळ कुहु कुहु बोले तू माझा तुझी मी झाले ऋतु राजा तुझी वासंती तरुतळी इथे एकांती कर कोमल देता हाती चांदण्यात दिवसा न्हाले. १९६० सालचा 'कन्यादान' चित्रपट. वसंत ऋतूच्या हंगामात फुललेले हे प्रणयगीत खरे तर निसर्ग गीत! प्रत्यक्ष कोकिळेचा कुहु कुहु स्वर व त्यात मिसळलेला स्वरकोकिळेचा स्वर! गाणे अजरामर होणारच! पी. सावळाराम यांचा प्रत्येक शब्द लता यांच्या स्वरावर हेलकावे खाऊन उषा किरण यांच्या अभिनयाने जिवंत साकार झाला.

उषा किरण बालपणीच्या उषा मराठे यांचा जन्म वसई येथे २२ एप्रिल १९२९ रोजी झाला. वडील बापूसाहेब मराठे यांना दोन मुली. मोठी लीला व धाकटी उषा. दोघींनाही बालपणापासूनच नृत्याची आवड होती. दोघींनीही बालपणीच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नर्तक उदयशंकर यांच्याकडे नृत्याचे रीतसर शिक्षण घेतले. वयाच्या १२ व्या वर्षी 'आशीर्वाद' या नाटकात काम करून रंगभूमीवर प्रवेश केला. १९४७ साली 'कुबेर' या मराठी चित्रपटाद्वारे मराठी चित्रपट प्रवेश केला व १९४८ साली उदयशंकर यांच्या 'कल्पना' नामे नृत्यप्रधान चित्रपटाद्वारे हिंदीत प्रवेश झाला.

१९४९ साली 'मायाबाजार' चित्रपटात रुक्मिणीची मोठी भूमिका उत्कृष्ट सादर केली अन् निर्मात्यांची नजर त्यांच्यावर वळली. १९५० सालच्या 'श्रीकृष्ण दर्शन' चित्रपटाद्वारे उषा मराठेच्या उषा किरण झाल्या. १९५४ साली डॉ. मनोहर खेर यांच्यासोबत विवाह झाला. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी चित्रपटाला ऊर्जा प्राप्त करून देणार्या व हिंदीत दिग्गज अभिनेत्रींच्या स्पर्धेत आपली वेगळी छबी निर्माण करणाऱ्या उषा किरण नावाच्या या हुकमाच्या राणीने ९ मार्च २००० रोजी आपला डाव सोडून आकाशात शुक्राची चांदणी होणे पसंत केले. त्यांचे पडद्यावरील कोकिळ स्वर आजही वनराजीत गुंजत असतील... '**कोकिळ कुहु बोलेऽऽ**

**रमेश पोफळी**

# गोविंदासोबतच्या अफेअरच्या चर्चांवर नीलमने मौन सोडलं!



बॉलिवूड इंडस्ट्रीत कोणताही अभिनेता आणि अभिनेत्री दोघांचे एकामागून एक चित्रपट एकत्र काम केल्याचे प्रदर्शित झाल्यानंतर दोघांचे अफेअर असल्याच्या चर्चा रंगायच्या. तो काळ म्हणजे नव्वदचा. याच काळात अनेक पुरुष आणि महिला कलाकारांच्या जोड्यांमुळे चित्रपट हिट ठरले. अशीच एक जोडी त्या काळात खूप गाजली. अभिनेता गोविंदा आणि अभिनेत्री नीलम कोठारी यांची. दोघांनेही काही मोजक्याच चित्रपट काम करून प्रेक्षकांच्या पसंतीची जोडी म्हणून लोकप्रियता मिळवली. दोघांच्या अफेअरच्या देखील बऱ्याच चर्चा त्यावेळी झाल्या. आता बर्याच वर्षांनी अभिनेत्री नीलम कोठारी हिने एका पॉडकास्टमध्ये यावर भाष्य केले आहे. बॉलिवूड स्टार कलाकार गोविंदा गेल्या काही दिवसांपासून त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. अलिकडेच गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता आहुजा घटस्फोट घेणार असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. मात्र, त्यानंतर आता परिस्थिती स्थिरावली आहे. परंतु, काही दिवसांपूर्वी सुनीता आहुजाने गोविंदावर अनेक गंभीर आरोप केले होते, हे आरोप गोविंदाने फेटाळून लावले होते. सुनीता गोविंदाच्या अफेअरबद्दल वारंवार बोलली आहे. याच दरम्यान अभिनेत्री नीलम कोठारी हिने अफेरच्या चर्चांवर भाष्य केले आहे. नीलम कोठारी हिने एका पॉडकास्टमध्ये या अफवेला उघडपणे उत्तर दिले आहे. तिने स्पष्टपणे सांगितले की तिचे गोविंदासोबत अफेअर नव्हते. अरे देवा, हे कोण म्हणत आहे? गोविंदा जी खूप छान व्यक्ती आहेत, पण हे पूर्णपणे खरे नाही. आम्ही एकत्र अनेक हिट चित्रपटात काम केले आहे, पण आमच्यात काहीही नव्हते. माफ करा, हे खरे नाही. असे नीलम कोठारी म्हणाली आहे. पुढे बोलताना नीलम म्हणाली, त्या वेळी लिंक-अपचा खेळ प्रचलित होता. जर दोन कलाकारांनी एकत्र दोन किंवा तीन चित्रपट केले तर असे गृहीत धरले जात असे की त्यांचे प्रेमसंबंध आहेत.



# सर्जनशील काम आठ तासांपेक्षा अधिक वेळ नको!

अभिनेत्री दीपिका पादुकोणच्या आठ तास कामाच्या मागणीमुळे गेल्या वर्षी इंडस्ट्रीतील अनेकांमध्ये वाद-विवाद आणि चर्चा झाल्या. अशातच आता अभिनेते आशुतोष राणा यांनीसुद्धा याबद्दल त्यांचे मत मांडलं आहे. आठ तास कामाच्या मागणीमुळे दीपिकानं दोन मोठे प्रोजेक्टही गमावल्याचं म्हटलं जातं. दिवसाला आठ तास काम करणार ही मागणी केल्यानंतर काहींनी तिच्या समर्थनार्थ मत मांडलं; तर काहींनी त्यांची प्रतिक्रिया व्यक्त केली. अशातच आता आशुतोष राणा यांनीसुद्धा दीपिकाच्या या मागणीचं समर्थन करीत त्यांची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. आशुतोष राणा यांनी आठ तासांच्या कामाच्या तासांमुळे कामही अधिक सर्जनशील पद्धतीनं होतं, असं म्हटलं आहे. ते म्हणाले, मला असं वाटतं की, सर्जनशील पद्धतीचं काम आठ तासांपेक्षा अधिक वेळ नाही केलं पाहिजे. आठ तास ही कामाची योग्य वेळ आहे. आठ तासांमध्ये काम पूर्ण होऊ शकतं. जर तुमचं प्री-प्रॉडक्शन खंबीर असेल आणि सगळ्या गोष्टी सुरळीत सुरू असतील, गोष्टींबद्दल स्पष्टता असेल, तर तुम्हाला माहित असतं की, कधी काय करायचं आहे. त्यामुळे आठ तास ही कामाची योग्य वेळ आहे. आशुतोष त्याबद्दल पुढे म्हणाले, जर तुम्ही आठ तासांहून अधिक कालावधी कामाची वेळ ठेवली, तर त्याचा कामाच्या क्वॉलिटीवर परिणाम होतो. त्या कामामध्ये ताकद व ऊर्जा लागते आणि प्रत्येकजण २० तास करू शकत नाही. एखादे दिवसी ठिक आहे. पण; पण जर ती सवय बनली, तर मग तुम्ही लक्षात घ्यायला हवं की, त्याचा तुमच्यावरही परिणाम होऊ शकतो. मला आठ तास काम ही पद्धत पटते. दरम्यान, आशुतोष यांच्यासह अनेक अभिनेते, अभिनेत्रींनी अभिनय क्षेत्रातील कामाच्या तासांबद्दल त्यांच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.



# ‘लस्ट स्टोरीज’ पुन्हा येणार भेटीला!

बोल्ड विषयांना वेगळ्या उंचीवर घेऊन जात तितक्याच प्रगल्भतेने त्याकडे पाहण्याचा दृषिकोन लस्ट स्टोरीज या वेबसिरीजने केला. या वेबसिरीजच्या पहिल्या आणि दुसऱ्या सीझनला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला. आता तिसरा सीझन प्रेक्षकांच्या भेटाला येण्यासाठी सज्ज झाला आहे. नेटफ्लिक्सने २०२६ मध्ये रिलीज होणाऱ्या वेबसिरीजची घोषणा केली असून, यामध्ये ‘लस्ट स्टोरीज’ ३ चा समावेश आहे. या सिरीजचा एक छोटा व्हिडीओ समोर आला आहे. यावेळी कलाकारांसह दिग्दर्शकांची दमदार टीम असणार आहे. मानवी इच्छा, वासना आणि नात्यांमधील गुंतागुंत या तीन गोष्टींवर या वेबसिरीजचा डोलारा उभा आहे. अगोदरच्या दोन्ही सीझनमध्ये प्रत्येक एपिसोड वेगवेगळ्या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केला होता. आता तिसऱ्या सीझनमध्ये देखील तोच फॉर्म बघायला मिळणार आहे. व्हिडीओ पाहिल्यानंतर उत्सुकता प्रचंड वाढली आहे. विशेष म्हणजे प्रत्येक एपिसोडमध्ये नवे कलाकार आहेत. शकुन बत्राने दिग्दर्शित केलेल्या एपिसोडमध्ये अली फजल आणि राधिका मदान यांची फ्रेश जोडी प्रेक्षकांना पाहायला मिळेल. विक्रमादित्य मोटवाने यांच्या कथेत राधिका आपटे आणि विजय मुख्य भूमिकेत आहेत. किरण राव यांच्या दिग्दर्शनाखाली गुरफतेह पिरजादा आणि अभिनेत्री सना थंपी झळकणार आहेत. तर विशाल भारद्वाज आणि अदिती राव हैदरी ही जोडी पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहे. रोनी स्क्रूवाला आणि आशी दुआ यांनी या प्रोजेक्टची निर्मिती केली आहे. २०१८ मध्ये लस्ट स्टोरीजचा पहिला सीझन रिलीज झाला होता. या सीरीजने धुमाकूळ घातला. पहिल्या सीझनमध्ये कियारा अडवाणी, विकी कौशल आणि भूमी पेडणेकर यांच्या भूमिका होत्या. त्यानंतर या सिरीजचा २०२३ मध्ये दुसरा सीझन आला. यामध्ये काजोल, तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा यांच्या अफलातून भूमिकेने प्रेक्षकांच्या मनावर गारूड निर्माण केले. आता तिसऱ्या सीझनची घोषणा करण्यात आली असून, प्रदर्शनाची तारीख समोर आलेली नाही. पण २०२६ मध्ये लस्ट स्टोरीजचा तिसरा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# 'ईठा'साठी रणदीपचं जबरदस्त ट्रान्सफॉर्मेशन

बॉलिवूडचा 'मेथड ॲक्टर' म्हणून ओळखला जाणारा रणदीप हुडा पुन्हा एकदा आपल्या जबरदस्त ट्रान्सफॉर्मेशनमुळे चर्चेत आला आहे. रणदीप प्रत्येक सिनेमासाठी जीव तोडून मेहनत करताना दिसतो. आत दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांच्या आगामी 'ईठा' या सिनेमासाठी रणदीपने स्वतःच्या शरीरयष्टीत मोठा बदल केला आहे. रणदीपचा बदललेला लूक पाहून चाहते थक्क झाले आहेत. आपल्या प्रत्येक भूमिकेसाठी जीव ओतणारा रणदीप याही वेळी काही वेगळे करत आहे. 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटासाठी त्याने वजन अत्यंत कमी केले होते, मात्र 'ईठा'साठी त्याने शरीरयष्टी कमावली असून त्याचा भारदस्त लूक सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मुंबईत शूटिंगदरम्यान त्याला या नवीन अवतारात पाहिल्यानंतर चाहत्यांमध्ये चित्रपटाबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. रणदीप सिनेमात नक्की कोणती भूमिका साकारणार, याकडे सर्वांचं लक्ष आहे. 'ईठा' हा चित्रपट महाराष्ट्राच्या लावणी सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनप्रवासावर आधारित आहे. विठाबाईंना प्रेमाने 'विठा' म्हटले जायचे, त्यावरूनच चित्रपटाचे नाव 'ईठा' असे ठेवण्यात आले आहे. श्रद्धा कपूर यामध्ये विठाबाईंची मुख्य भूमिका साकारत असून रणदीप हुडा तिच्या पतीची भूमिका साकारण्याची शक्यता आहे. अर्थात याविषयी अधिकृत माहिती अजून समोर आली नाही. 'ईठा' सिनेमानिमित्ताने श्रद्धा कपूर आणि रणदीप ही जोडी पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र दिसणार आहे. श्रद्धा या भूमिकेसाठी खास लावणी आणि मराठमोळ्या संस्कृतीचे प्रशिक्षण घेत आहे. महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा सांगणारा हा चित्रपट हिंदी आणि मराठी अशा दोन्ही प्रेक्षकांसाठी खास असणार आहे. 'लुका छुपी', 'मिमी' आणि नुकताच गाजलेला 'छावा' फेम दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. आपल्या मातीतील कथा मोठ्या पडद्यावर मांडण्यासाठी प्रसिद्ध असलेले उतेकर आता 'ईठा'च्या माध्यमातून एक भावनिक आणि सांस्कृतिक प्रवास प्रेक्षकांसमोर आणणार आहेत.



# सोशल मीडिया बंद करावंस वाटत होतं!

बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट सध्या तिच्या करिअरमध्ये व्यस्त आहे. याशिवाय लेक राहासोबत वेळ घालवण्यासही आलिया प्राधान्य देते मात्र, नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत आलियाने आपल्या मनातील एक मोठी खंत बोलून दाखवली आहे. लेक राहाच्या जन्मानंतर आलियाला तिचे सोशल मीडिया अकाउंट कायमचे डिलीट करायचे होते, असा खुलासा तिने केला आहे. आलियाने मुलाखतीत सांगितले की, आई झाल्यानंतर तिच्या आयुष्यातील प्राधान्यक्रम पूर्णपणे बदलले आहेत. सोशल मीडियावर होणारी सततची टीका, ट्रोलिंग आणि लोकांच्या अनावश्यक कमेंट्सचा तिच्या मानसिक शांततेवर परिणाम होत होता. आपल्या मुलीसोबत वेळ घालवताना बाहेरच्या जगातील या नकारात्मकतेचा स्पर्शही तिला नको होता. मानसिक शांततेसाठी सोशल मीडियापासून दूर राहणे अधिक महत्त्वाचे वाटते, असे आलिया यावेळी म्हणाली. मुलाखतीत तिने पुढे नमूद केले की, अनेकदा लोक कोणत्याही गोष्टीवरून कलाकारांना ट्रोल करतात. कधी अभिनयावरून तर कधी वैयक्तिक आयुष्यावरून होणाऱ्या या टीकेचा सामना करणे कठीण जाते. विशेषतः जेव्हा तुम्ही आई- बाबा होतात, तेव्हा तुम्ही तुमच्या मुलाच्या सुरक्षिततेबाबत आणि भविष्याबाबत अधिक संवेदनशील होता. यामुळेच या सर्व एका क्षणी आलियाला असे वाटले की, हे सर्व बंद करून सोशल मीडियावरून बाहेर पडावे. मात्र, चाहत्यांचे प्रेम आणि आपल्या कामाची गरज ओळखून तिने हा टोकाचा निर्णय घेतला नाही. सध्या आलिया सोशल मीडियाचा वापर अत्यंत मर्यादित आणि केवळ आवश्यक कामासाठीच करत असल्याचे दिसून येते. आपल्या मानसिक स्वास्थ्याला जपण्यासाठी तिने नकारात्मक कमेंट्सकडे दुर्लक्ष करणे शिकले आहे, असेही तिने स्पष्ट केले.

# गायक अरिजीत सिंग काढणार राजकीय पक्ष?

बॉलीवूडमधील सर्वात लोकप्रिय गायक अरिजीत सिंगने पार्श्वगायनातून निवृत्ती जाहीर केली आहे. जी कामे आधीपासून घेतली आहे, ती पूर्ण करणार, त्यानंतर चित्रपटांमध्ये पार्श्वगायन करणार नसल्याचं अरिजीत सिंगने म्हटलं आहे. २७ जानेवारी रात्री त्याने हा निर्णय जाहीर केल्यानंतर चाहत्यांना व संगीत विश्वाला मोठा धक्का बसला. अवघ्या ३८ व्या वर्षी अरिजीत सिंगने निवृत्ती घेतली.

पार्श्वगायनातून निवृत्ती घेतल्यानंतर अरिजीत सिंग काय करणार? याबद्दल सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली. अरिजीत राजकारणात पदार्पण करणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. वृत्तानुसार, गायक अरिजित सिंग राजकीय पक्ष सुरू करण्याचा विचार करत असल्याची चर्चा होत आहे. पण तो राजकीय पक्षाची स्थापना लवकरच करणार नाही.

२०२६ च्या बंगाल विधानसभा निवडणुकीनंतर तो पक्ष स्थापन करू शकतो. येत्या काळात अरिजीत सिंग निवडणुकीच्या रिंगणात दिसू शकतो. गायकाने राजकीय क्षेत्रात करिअर करण्यासाठी तयारी आधीच सुरू केल्याचे वृत्त अरिजीत सिंगच्या जवळच्या लोकांचा हवाला देत म्हटलं आहे. कोट्यवधींच्या संपत्तीचा मालक असलेला अरिजीत सिंग पश्चिम बंगालमध्ये राहणं पसंत करतो. तो मूळचा पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील जियागंजचा रहिवासी आहे. हॅलो, सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा. इतकी वर्षे श्रोते म्हणून तुम्ही मला दिलेल्या प्रेमासाठी धन्यवाद.

मी आनंदाने जाहीर करतोय की यापुढे पार्श्वगायक म्हणून मी कोणतेही नवीन काम घेणार नाही. मी निवृत्ती घेतोय. हा प्रवास खूप सुंदर होता, असं अरिजीत सिंगने पोस्टमध्ये लिहिलं. यानंतर त्याने एक्सवर पोस्ट करून तो गाणी गाणार नसला तरी संगीत निर्मिती करत राहणार आहे, असं म्हणाला होता. नव्या गायकांना संधी मिळावी, अशी इच्छाही त्याने व्यक्त केली होती. गायक म्हणून निवृत्ती घेतल्यावर भारतीय शास्त्रीय संगीताकडे वळणार असल्याचं अरिजीतने सांगितलं.





# बॉलिवूडमध्ये आता चांगले सिनेमे बनतच नाहीयेत!

बॉलिवूडमध्ये दरवर्षी अनेक सिनेमे येतात. मात्र प्रत्येकच सिनेमा चालतो असं नाही. कोरोना काळानंतर अनेक हिंदी सिनेमे आपटले. पण आता बॉलिवूड पुन्हा हळूहळू सावरतंय. प्रेक्षकांना चांगलं काहीतरी बघायचं आहे त्यामुळे मेकर्सलाही तसाच कंटेंट आणायचा आहे. प्रेक्षक चोखंदळ झाले आहेत. दरम्यान एका अभिनेत्याने बॉलिवूडमध्ये सध्या चांगले सिनेमे बनत नाहीयेत असं वक्तव्य केलंय. कोण आहे तो? आगामी 'ओ रोमिओ' सिनेमात दिसणारा शाहिद कपूर सध्या चर्चेत आहे. करिअरच्या सुरुवातीला चॉकलेट बॉय म्हणून शाहिदीला ओळख मिळाली होती. आजवर त्याने विविधांगी भूमिका केलेले सिनेमे दिले.

नुकतंच एका मुलाखतीत तो म्हणाला, मला वाटतं मेणबत्ती दोन्ही बाजूने जळते. प्रेक्षकही त्यांचा संयम हरवत चालले आहेत. त्यांचं लक्ष एकावर केंद्रित होत नाहीये. त्यांना स्टिम्युलेशन हवं आहे, त्यांना ब्रेक हवा. कारण ही डोपामाइन हिट आहे. क्रिएटर्सही आपल्यासोबत हेच करत आहेत. प्रेक्षकांना सिनेमे पाहायचे नाहीत असं नाही पण आता आपण इतके चांगले चित्रपट बनवत नाही आहोत जितके बनवायला हवे. ही दोन्ही बाजूंनी चालणारी प्रक्रिया आहे. शाहिदने आव्हानाबद्दल भाष्य केले आहे जे गेल्या काही काळापासून चित्रपटसृष्टीला सतावत आहे ते म्हणजे बनावट मार्केटिंग. तो म्हणाला, लोकांना समजत नाही, पण हा आयुष्यातील एक चमत्कार आहे की लोकांनी भरलेलं एखादं सभागृह खरोखर टाळ्या वाजवतंय, शिट्ट्या मारतंय आणि तुम्हाला ती ओळख मिळवून देतंय, तुम्हाला स्वतःपेक्षा मोठे स्थान देतंय...ही खूप सुंदर गोष्ट आहे. म्हणूनच कला खास असते. पण जेव्हा त्यात काहीतरी बनावट शिरते तेव्हा ते तसे नैसर्गिक वाटत नाही. मार्केटिंग ही अशी गोष्ट आहे जी प्रत्येकाला करावीच लागते. पण मार्केटिंग 'योग्य' आणि 'अयोग्य' मधील रेषा कधी ओलांडते? हे सर्वस्वी तुमच्या स्वतःच्या नैतिकतेच्या जाणिवेवर अवलंबून असते. जर तुम्ही त्या भावनेतून काम करणे निवडले, तर ती गोष्ट वेगळी असते. पण जर तुम्ही फक्त व्यवसाय आणि आकड्यांसाठी काम करत असाल तर शेवटी ते फक्त व्यवसाय आणि आकडेच राहतात.